SEED

Suresh Dada Scheme for
Educational & Entrepreneurial Development
सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजक विकास योजना

आमचे ध्येय -

गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक व उद्योजकीय कौशल्ये विकसित करून त्यांना जागतिक स्तरावर सक्षम बनविणे.

# ज्ञानयज्ञ



वर्ष - १ अंक - १ नोव्हेंबर २०११ - फेब्रुवारी २०१२

# संपादकीय

'सुरेशदादा - स्कीम फॉर एज्यूकेशनल ॲण्ड इन्ट्रीप्रुन्येरीयल डेव्हलपमेंट' म्हणजे 'एसडी-सीड' या योजनेअंतर्गत जळगाव जिल्ह्यातील गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते. सन २००८ पासून सुमारे ६५०० विद्यार्थ्यांनी या शिष्यवृत्तीचा लाभ घेतला आहे.

गेल्या सलग चार वर्षापासून देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीपुरते मर्यादित न राहता 'एसडी-सीड' मार्फत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी व आत्मविश्वास वाढविणारे उपक्रम विनामूल्य आयोजित केले जातात. या उपक्रमांची विस्तृत माहिती तसेच शैक्षणिक क्षेत्रातील माहिती, प्रेरणादायी लेख, विविध स्पर्धा परीक्षांची माहिती, अभ्यासक्रमांची ओळख इ. माहिती 'ज्ञानयज्ञ' या एसडी-सीडच्या बातमीपत्रामधून देण्यात येणार आहे.

'ज्ञानयज्ञ' हे पहिले बातमीपत्र प्रकाशित करतांना आम्हाला मनस्वी आनंद होत आहे. हे बातमीपत्र दर तीन महिन्यांनी प्रकाशित केले जाईल. पहिल्या अंकात एसडी-सीडने विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या विविध उपक्रमांची माहिती, एसडी-सीडच्या विविध सहायता योजनांची माहिती, विशेष लेख, काही विद्यार्थ्यांचे मनोगत, आरोग्य विषयक उपयुक्त सुचना, शैक्षणिक क्षेत्रातील घडामोडी आदी माहिती प्रकाशित करण्यात आली आहे. ही माहिती निश्चीतच विद्यार्थ्यांना मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरेल.

जळगाव जिल्ह्यातील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक व उद्योजकीय कौशल्ये विकसित करून त्यांना जागतिक स्तरावर सक्षम बनविणे हे ध्येय समोर ठेवून मा.आ. श्री. सुरेशदादा जैन यांच्या मार्गदर्शनाखाली 'सुरेशदादा - स्कीम फॉर एज्यूकेशनल ॲण्ड इन्ट्रीप्रुन्येरीयल डेव्हलपमेंट' म्हणजे 'एसडी-सीड' ही योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.

श्री. सुरेशदादा जैन हे संपूर्ण महाराष्ट्राला सुपरिचित असे व्यक्तिमत्व आहे. राजकीय, शैक्षणिक, सामाजिक, आरोग्यविषयक, सांस्कृतिक तसेच अशा अनेक क्षेत्रात दादा गेल्या ४० वर्षापासून अथकपणे कार्यरत आहेत. सेवेचा हा वारसा आई वडिलांकडूनच दादांना मिळाला आहे. जळगावचा विकास व्हावा, यासाठी दादांनी नेहमीच पुढाकार घेतला आहे.

हा अंक आपणा सर्वांना निश्चितच आवडेल. आपल्या सूचना स्वागतार्ह्य आहेच. आपल्या योग्य सूचनांमुळे पुढील सर्व अंक निश्चितच अधिक प्रभावीपणे प्रकाशित करण्यास आम्हास बळ मिळेल. पुढील अंक मे-२०१२ मध्ये प्रकाशित होणार आहे. बातमीपत्रामध्ये प्रकाशित करण्याजोगे साहित्य आपणाकडून अपेक्षित आहे. योग्य साहित्याला निश्चितच प्रकाशित केले जाईल.

**एन. जे. गादिया**
**संपादक**

**ज्ञानयज्ञ संपादक मंडळ -**

**श्री. राजेश यावलकर (ज्ञानयज्ञ प्रमुख संपादक), श्री. एन. जे. गादिया, श्री. महेश गोरडे,**
**श्री. नीळकंठराव गायकवाड, श्री. सुधीर महाजन, प्रा. एस. व्ही. सोमवंशी**

## एसडी-सीडचा पाया...

# 'एसडी-सीड' शिष्यवृत्ती

आपल्या परिवाराच्या आर्थिक दुर्बलतेपुढे गुढघे न टेकता हे आव्हान समजून काही युवक लढा देत स्पर्धेत टिकून राहण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रतिभावंत होतकरू, गरजवंत हुषार विद्यार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून एसडी-सीड मार्फत सन २००८ पासून शिष्यवृत्तीच्या रूपाने आर्थिक मदत देण्यात येते.

१९ सप्टेबर २०११ रोजी एसडी-सीड आयोजित भव्य शिष्यवृत्ती वितरण सोहळ्यात आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथजी माशेलकर यांच्या उपस्थितीत उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या जिल्ह्यातील २५२५ विद्यार्थ्यांना मा. आ. सुरेशदादा जैन यांनी उपलब्ध करून दिलेली १ कोटी रूपयांची शिष्यवृत्ती वितरीत करण्यात आली.

**विद्यार्थ्यांनी यशाने हुरळून न जाता, प्रयत्नांची पराकाष्ठा करून यशाचे शिखर गाठल्यास जळगावमधील व्यक्तीला नोबेल पारितोषिक मिळू शकते असा विश्वास डॉ. रघुनाथजी माशेलकर यांनी यावेळी व्यक्त केला.**








## कार्यक्रमांची आखणी...

**"जळगाव जिल्ह्यातील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक व उद्योजक कौशल्य विकसित करून त्यांना जागतिक स्तरावर सक्षम बनविणे"** हे ध्येय साध्य करण्यासाठी एसडी-सीडच्या माध्यमातून विद्यार्थीहिताचे अनेक उपक्रम राबविले जातात.

विद्यार्थीहिताचे कार्य करत असतांना विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून विद्यार्थ्यांच्या असलेल्या अनेक शैक्षणिक समस्या, त्याला येणाऱ्या अडचणी, त्याच्या शैक्षणिक गरजा, अपेक्षा, त्याची रूची, आवड हे जाणून घेणे महत्त्वाचे असल्यामुळे सर्वप्रथम एसडी-सीडने संपूर्ण जळगाव जिल्ह्याचा शैक्षणिक दौरा करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते? त्यांच्या अपेक्षा काय? त्यांच्या शैक्षणिक गरजा काय? हे जाणून घेतले. त्या सर्व बाबींवर तज्ञ मंडळींनी सखोल अभ्यास केला. सर्व गरजा, समस्या व अपेक्षांचे विश्लेषण करून विद्यार्थ्यांना त्या सर्व आवश्यक बाबी कशा प्रकारे उपलब्ध करून देता येतील, यासाठी वेगवेगळ्या उपक्रमांची आखणी केली गेली. जेणेकरून विद्यार्थ्यांच्या अधिकाधिक समस्यांचे निवारण होईल व क्षितिजापलीकडे जाण्याची संधी त्यांना प्राप्त होईल. यातून विकसित, सुसंस्कृत, सुशिक्षित व सामर्थ्यवान असा विद्यार्थी घडावा, यासाठी एसडी-सीड मार्फत गेल्या वर्षभर प्रत्येक तालुका स्तरावर विविध कार्यक्रम विनामूल्य राबविले जातात. ते पुढील प्रमाणे -

## करिअर मार्गदर्शन

एसडी-सीड तर्फे विद्यार्थ्यांसाठी विविध मार्गदर्शन सत्र आयोजित केले जातात. या कार्यक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना विविध प्रकारच्या करिअरबद्दलची माहिती दिली जाते, त्यामुळे विद्यार्थ्यांना करिअर निवडीसाठी महत्वपूर्ण व योग्य ते मार्गदर्शन मिळते.

एसडी-सीड तर्फे १८ डिसेंबर ते २५ डिसेंबर २०११ दरम्यान जळगाव जिल्ह्यातील ९ तालुक्यांमध्ये प्रख्यात CET मार्गदर्शक इंजि. श्री. हेमचंद्र शिंदे यांचे **'करिअर मार्गदर्शन सेमिनार'** आयोजित करण्यात आले होते. जिल्ह्यातील तब्बल ११६१ विद्यार्थ्यांनी या सेमिनारचा लाभ घेतला. मार्गदर्शनात ११ वी व १२वी सायन्सच्या विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा, तंत्र-मंत्र व प्रवेश प्रक्रिया यावर मार्गदर्शन करण्यात आले. त्यात अचूक सीईटी परीक्षेची निवड कशी करावी, प्रत्येक परिक्षेची पात्रता, उपलब्ध जागा व त्याचे वाटप, फॉर्म मागविताना, भरताना व पाठवताना घ्यावयाची काळजी, ऑनलाईन फॉर्म भरताना प्रवेश प्रक्रियेची माहिती, वैद्यकीय व अभियांत्रिकी शाखांमधील सद्यस्थिती आदिंवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.







मार्गदर्शन सेमिनारला विद्यार्थ्यांचा लाभलेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## अभिवृत्ती चाचणी

समाजाच्या प्रत्येक स्तरातील विद्यार्थी आणि पालक हे शिक्षणाबद्दल अत्यंत जागरूक आहेत. विद्यार्थ्यांमध्ये विविध क्षेत्रात करिअर घडवण्याची क्षमता विकसित होत आहे. प्रत्येक पालक आपल्या पाल्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी धडपडत असतात आणि म्हणूनच प्रत्येक विद्यार्थ्याच्या योग्यता व क्षमतांचे योग्य मूल्यमापन करून त्यांना चांगले करिअर निवडीसाठी निर्देशित केले जावे यासाठी विद्यार्थी मूल्यांकन कार्यक्रम घेतला जातो.

इ. ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी अभिवृत्ती चाचणी व इतर चाचण्या आयोजित करून त्याद्वारे त्यांच्यातील कौशल्ये व इतर क्षमतांची योग्य वेळेस जाणीव करून घेण्यास मदत करण्यात येते. याद्वारे विद्यार्थ्यांना त्यांची क्षमता व आवड यांची योग्य सांगड घालून स्वत:कडे असलेल्या क्षमतांद्वारे भविष्यातील गरजांप्रमाणे योग्य ते बदल घडवून आणण्यास मदत होते.




एसडी-सीड तर्फे २१ व २२ डिसेंबर २०११ रोजी जळगाव येथील महाराणा प्रताप माध्यमिक विद्यालय, मानव सेवा मंडळ विद्यालय तसेच अभिनव विद्यालय या शाळांमधील ८ वी च्या विद्यार्थ्यांची अभिवृत्ती चाचणी घेण्यात आली. यापुढेही जळगाव जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये या चाचण्या विनामूल्य आयोजित करण्याचा एसडी-सीडचा मनोदय आहे.

## युवती सशक्तीकरण

युवतींच्या जीवनशैलीवर आधुनिक बदलांमुळे होत असलेला परिणाम थांबविण्यासाठी व युवतींचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी एसडी-सीड तर्फे युवती सशक्तीकरण (एम्पॉवरमेंट ऑफ गर्ल्स) हे तीन दिवसीय शिबीर जळगाव येथे विनामूल्य आयोजित करण्यात आले होते. जळगावमधील मु. जे. महाविद्यालय, बेंडाळे महाविद्यालय, नूतन मराठा महाविद्यालय, महिला महाविद्यालय, आय.एन.आय.एफ.डी., मुलींचे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, इ. महाविद्यालयातील पंधरा ते पंचवीस वर्ष वयोगटातील जवळपास १०० युवतींनी या शिबिराचा लाभ घेतला.

या शिबिरात विषयतज्ज्ञांनी दोन पिढ्यांमधील वाढता दुरावा, परिवारात संवादाचा अभाव, महाविद्यालयीन वातावरणाचा प्रभाव, मैत्रीचे चांगले-वाईट परिणाम, परिवारांचे बदलते स्वरूप, मोबाईल व इंटरनेटचा प्रभाव, प्रसार माध्यमांचा प्रभाव, ग्रामीण व शहरी वातावरणाचा प्रभाव, मुली-मुलांमधील शैक्षणिक विकासातील तफावत, वैवाहिक जीवनाबद्दल योग्य मार्गदर्शनाचा अभाव, काहींचा साखरपुड्यानंतर विवाह मोडणे आदी मुद्द्यांवर पालकवर्ग व विद्यार्थीनींना मार्गदर्शन करण्यात आले. शिबिराच्या शेवटच्या दिवशी पालक व युवतींमध्ये समूह चर्चा झाली तसेच काही मुलींनी रोल-प्ले सादर केले.











## एसडी-सीडच्या विविध सहायता:

'एसडी-सीड' या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी विविध सहायता योजना सुरू केल्या आहेत. उदा. बँका व अन्य वित्तीय संस्थांमधून शैक्षणिक कर्ज, सरकारी व अन्य योजनांची माहिती, विविध कोर्सेस, स्पर्धा परिक्षांची माहिती, क्लासेस फी मध्ये सवलत, शैक्षणिक साहित्य खरेदीत सवलत इ. योजनांचा यात समावेश आहे. याचा लाभ घेण्यासाठी एसडी-सीडने प्रत्येक लाभार्थीला स्वत:चे एक स्मार्ट कार्ड दिले आहे. या स्मार्ट कार्डवर लाभार्थींचा लाभार्थी कोड, फोटो, पत्ता नमूद करण्यात आले आहे. प्रत्येक लाभार्थीचा स्वत:चा लाभार्थी कोड (बेनीफिशिअरी कोड) बनविला आहे, ज्याद्वारे लाभार्थी एसडी-सीडच्या विविध योजना व कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊ शकतात.

### बँका व अन्य वित्तीय संस्थांमधून शैक्षणिक कर्ज:

एसडी-सीडद्वारे उच्च शिक्षणासाठी आवश्यक शैक्षणिक कर्जासाठी विभिन्न १४ बँकांसोबत तसेच वित्तीय संस्थांसोबत सहकार्य करार केलेला आहे. शैक्षणिक कर्ज मिळविण्यासाठी लागणारी कागदपत्रे, पात्रता, बँकेचे नियम, प्रक्रिया इ. संपूर्ण माहिती व मार्गदर्शन एसडी-सीड कार्यालयात उपलब्ध केले जाते.



एसडी-सीडने शिष्यवृत्ती प्रदान करतानाच विद्यार्थ्यांची संपूर्ण पडताळणी केलेली असते, त्यामुळे बँकेत शैक्षणिक कर्ज मिळवण्यास गेलेल्या एसडी-सीड लाभार्थीला त्या संस्थेतर्फे प्राधान्य दिले जाते व संपूर्ण प्रक्रियेचा वेळ कमी करण्यास बँकेला सुद्धा मदत होत असते.

### क्लासेस व बुक स्टोअर्स सोबत सहकार्य करार:

एसडी-सीडच्या लाभार्थींना क्लासेस, स्टेशनरी खरेदी इत्यादींमध्ये सवलत मिळवून देण्यासाठी एसडी-सीडने जळगाव जिल्ह्यातील ३२ नामांकित कोचिंग क्लासेस व १५ बुक स्टोअर्स सोबत करार केले आहेत. या ठिकाणी एसडी-सीडच्या लाभार्थींना क्लास फीमध्ये तसेच पुस्तक खरेदीसाठी विशेष सवलत उपलब्ध करून दिली आहे.



विद्यार्थ्यांना या क्लासेसनी आकर्षक सवलत दिली आहे, काहींनी ५०% टक्के पर्यंत सवलत दिली आहे तर काही क्लासेस ५ विद्यार्थ्यांपर्यंत मोफत कोचिंग देण्यास तयार आहेत. तसेच बुक स्टोअर्स चालकसुद्धा विद्यार्थ्यांना २५ टक्के पर्यंत सूट देत आहेत. त्यामुळे लाभार्थींना शैक्षणिक खर्च कमी करण्यात मदत होत आहे. एसडी-सीडच्या लाभार्थींना या सवलतींचा अधिकाधिक फायदा व्हावा, याकरीता अजुनही विविध कोचिंग क्लासेस व बुक स्टोअर्स सोबत एसडी-सीड सहकार्य करार करणार आहे.


ज्याच्या जीवनामध्ये ध्येय नसते, त्यालाच वेळ घालवण्यासाठी साधन शोधण्याची गरज भासते.

## एसडी-सीड वेबसाईट: www.sdseed.in



आजचे जग हे माहिती-तंत्रज्ञानाचे जग आहे. एसडी-सीडची व एसडी-सीडच्या विविध उपक्रमांची माहिती संपूर्ण जगात कोठेही व केव्हाही उपलब्ध व्हावी, म्हणून एसडी-सीडने स्वत:ची वेबसाईट तयार केली आहे.

Knowledge Bank - एसडी-सीडने विद्यार्थ्यांसाठी आपल्या वेबसाईटवर Knowledge Bank या भागात अतिशय महत्त्वाचा आणि उपयुक्त माहिती संग्रह उपलब्ध करून दिला आहे. उदा. विविध स्पर्धा परीक्षांची ओळख, त्या परीक्षांसाठी लागणारी पात्रता, इतर खाजगी शिष्यवृत्ती योजना, सरकारच्या विविध योजना, विविध कोर्सेसची माहिती व त्याची प्रवेश प्रक्रिया, करिअरच्या नवनवीन उपलब्ध संधी इत्यादी. या माहितीचा विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअर निवडीसाठी तसेच पुढील वाटचालीसाठी नक्कीच उपयोग होईल.

तसेच एसडी-सीडच्या लाभार्थींना क्लासेसमध्ये व शैक्षणिक सामुग्री खरेदीत सवलत देणाऱ्या संस्थांची माहिती, शैक्षणिक कर्जासाठी करार झालेल्या बँक व अन्य वित्तीय संस्थांची माहिती, प्रत्येक तालुक्यातील एसडी-सीड समन्वयकाची माहिती आपल्या वेबसाईटवर उपलब्ध करून दिली आहे.

Beneficiary Login- या भागात एसडी-सीडने प्रत्येक लाभार्थीला त्याचे स्वत:चे एक लॉग-इन आयडी तयार करून दिले आहे, ज्याद्वारे लाभार्थी एसडी-सीडकडे आपली माहिती ऑनलाईन देऊ शकतील. एसडी-सीडतर्फे लाभार्थींसाठी दिल्या जाणाऱ्या सर्व सूचना, संदेश या अकाऊंटमधील इन्बॉक्स मध्ये विद्यार्थ्यांना पाहता येतील. यामुळे लाभार्थी एसडी-सीडसोबत अधिक संपर्कात राहू शकतो व विविध संधींचा अधिकाधिक लाभ घेऊ शकतो.

विद्यार्थ्यांना आपले अभिप्राय व मनोगत **Feedback** या भागात ऑनलाईन नोंदवता येतात. एसडी-सीडतर्फे घेण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांची विस्तृत माहिती, **फोटो, व्हिडीओ** इ. वेबसाईटवर प्रकाशित करण्यात येतात. विविध वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेल्या एसडी-सीडच्या बातम्या वेबसाईटवर उपलब्ध असतात.

एसडी-सीडसोबत स्वयंसेवक म्हणून काम करण्यास इच्छुक लोकांसाठी ऑनलाईन फॉर्म वेबसाईटवर दिला आहे, ज्याद्वारे एखादी व्यक्ती आपली माहिती एसडी-सीडपर्यंत पाठवू शकते. प्रत्येक विद्यार्थ्याला सहजपणे हाताळता यावी अशा प्रकारे वेवसाईटची रचना करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना याचा नक्कीच फायदा होईल.

## माझाही सहभाग...


**'एसडी-सीड कडून' मागील चार वर्षांपासून शिष्यवृत्ती मिळवून आपले शिक्षण पूर्ण करून आज अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रात नोकरीस लागलेले आहेत व आपापल्या क्षेत्रात उत्तम कार्य करून स्वत:च्या पायावर उभे झाले आहेत. त्यातील काही विद्यार्थ्यांनी त्यांना मिळालेल्या शिष्यवृत्तीचा छोटासा भाग एसडी-सीडला देऊ केला आहे; जेणेकरून त्यांच्यासारख्या गरजवंत, गुणवान विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त मदत मिळावी.**



हिरालाल चौधरी, चाळीसगाव

"एसडी-सीडतर्फे मला गेल्या २ वर्षांपासून शिष्यवृत्ती मिळत आहे. मला सांगतांना अभिमान वाटतो की आज मी पुणे विद्यापीठात इंजिनिअरींगच्या प्रिंटींग टेक्नॉलॉजी ह्या ब्रँचमध्ये सर्वप्रथम आलो आहे. हे शक्य झाले ते दादांनी माझ्यावर दाखवलेल्या विश्वासामुळे. 'देणाऱ्याने देत जावे आणि घेणाऱ्याने घेत जावे, घेता घेता देणाऱ्याचे हात घ्यावे' म्हणजेच त्या हातांचा गुण नक्की घ्यावा. दादांचा हा गुण माझ्या आचरणात घेत मी स्वयंपूर्तीने रू. ३,००० एसडी-सीड च्या विद्यार्थ्यांसाठी देत आहे. मला विश्वास आहे की काही वर्षांनी ही शिष्यवृत्ती फक्त दादाच देणार नाहीत तर विद्यार्थीच आपल्या पुढच्या पिढीला मदत करण्यास पुढे येतील."

## आभारपत्र...



SD SEED
Suresh Dada Scheme for Educational & Entrepreneurial Development
सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजक विकास योजना

Date : 10th January 2012

Mr. Hiralal R Chaudhari
Shripad Nagar
Bhadgaon Raod
Chalisgaon
Dist Jalgaon

Dear Mr. Chaudhari

I am pleased that you are enjoying the benefits of our program and have made excellent progress in your career.

Your touching gesture of donating Rs. 3000/- completes the circle of beneficiaries reaching out to other beneficiaries.

I am sure this sincere gesture will set a shining example to all Beneficiaries.

We will shortly be launching our Alumni network. Do visit our website www.sdseed.in for updates.

Wishing you all the very best in all your endeavours,

Yours sincerely

MEENAKSHI JAIN
EXECUTIVE PRESIDENT

# पुढे व्हा !



जेव्हा आपण अडचणीत असतो, पुढे जाण्याचा मार्ग सापडत नसतो, अशावेळी आपल्या मदतीला हमखास धावून येणारा आपला सर्वात जवळचा मित्र म्हणजे आपण स्वतः !

ज्या व्यक्ती स्वतःच स्वतःला मदत करतात अशा व्यक्तींना मार्ग लवकर सापडतो. विद्यार्थी मित्रांनो, तुम्हालाही शिक्षणाच्या वाटेवरून पुढे जायचे आहे. रस्ता सोपा नाही. खाचखळग्यांनी भरलेला आहे. वार्षिक परीक्षा तुम्हाला खुणावतेय. उत्तम गुण मिळविण्याचं तुमचं लक्ष्य आहे. अशावेळी तर तुम्हाला तुम्हीच मदत करणं अत्यंत आवश्यक आहे.

शिक्षकांकडून तुम्हाला ज्ञान, माहिती व मार्गदर्शन सर्वच मिळेल; परंतु परीक्षेत प्रश्नपत्रिका आपली आपल्यालाच सोडवावी लागते. यासाठी आपल्यात योग्य सामर्थ्य आपण निर्माण केले पाहिजे. यासाठी आज आपण कुठे आहोत, हे सुद्धा तपासून पाहिलं पाहीजे. म्हणजे मगच आपल्यातील कमतरता सुधारता येतील. स्वतःचं पृथक्करण करण्याच्या या पद्धतीला इंग्रजी मध्ये स्वोट ॲनलिसिस (SWOT Analysis) असे म्हणतात.

| | | |
|---|---|---|
| S | - Strengths | **- बलस्थान, सद्‌गुण** |
| W | - Weaknesses | **- कमतरता, कच्चे दुवे, दुर्गुण** |
| O | - Opportunities | **- संधी** |
| T | - Threats | **- अडथळे, धोके** |

**१) आपली बलस्थाने ओळखा :-**
आपल्यात जन्मजात काही सामर्थ्य असते. विविध गुण, कला-कौशल्ये आपण अनुवांशिकतेने मिळवतो, तर काही आपण स्वतः शिकतो. आपल्यातील ही बलस्थाने कोणती हे आपल्याला माहिती असायला हवं, अन्यथा ही सुप्तावस्थेतील बलस्थानं टाकाऊ वस्तूंप्रमाणे पडून राहतील. उत्तुंग भरारी घेण्याची स्वतःतील क्षमता गरूड वेळीच ओळखतो व एका गरूड झेपेतच आसमंताला गवसणी घालतो.

मी वेगाने पळू शकतो, माझी स्मरणशक्ती चांगली आहे, मी दीर्घकाळ एका ठिकाणी बसून अभ्यास करू शकतो, मी छान बोलू शकतो, माझ्याजवळ अभ्यासासाठी लागणारी सर्व पुस्तके, शालेय साहित्य उपलब्ध आहे.

अशी कितीही बलस्थान तुमच्यात असू शकतील. ही बलस्थाने जाणून घ्या. कागदावर उतरवा.

**२) आपल्यातील कमतरता, कच्चे दुवे ओळखा :-**
मी व्यायाम करत नाही, मला फार लवकर राग येतो, मी उशीरा उठतो, मला अभ्यासाला बसले की झोप लागते.... असे अनेक कच्चे दुवे आपल्यात असतात.

**३) आपल्याला मिळणाऱ्या संधी ओळखा :-**
अभ्यास चांगला होण्यासाठी मिळणाऱ्या संधी, शिक्षणात उपयोगी पडणाऱ्या संधी, यशस्वी करिअरसाठीच्या संधी, व्यावहारिक जीवनातील संधी... अशा संधी व अनुकुलता शोधत, त्या पकडून पुढे पुढे जायचे असते, एकच संधी एकाच वेळी अनेकांना मिळू शकते, जो तात्काळ संधीला प्रत्यक्षात आणतो तोच यशस्वी होतो.

**४) मार्गातील अडथळे व धोके ओळखा :-**
ध्येयप्राप्तीच्या आपल्या मार्गात कोणकोणत्या अडचणी येऊ शकतात, याचे अंदाज बांधा. अशा अडचणींवर काय उपाययोजना करायची ते ठरवा. तशी सिद्धता ठेवा. यासाठी काही साधने, थोरामोठ्यांचे मार्गदर्शन, सारासार विचार, निर्णयक्षमता व आत्मविश्वासाची गरज लागेल. सतत शिकणे, प्रशिक्षण घेणे, इतरांच्या अनुभवातून स्वतः शहाणे होणे, ही वृत्ती स्वतःच निर्माण करा.

स्वतःच स्वतःचे पृथक्करण करून आपण काय आहोत? हे आपल्याला कळते. पुढे कसे जायचे? हे समजते. स्वतःतील बलस्थानांचा योग्य वापर करून आत्मविश्वास वाढवता येतो. स्वतःतील कमतरतांवर मात करून पुढे जाण्याचा मार्ग निर्धोक करता येतो. संधीचा, वेळेचा फायदा करून घेता येतो व जीवनातील अडचणींवर मात करत करत आपले स्वप्न आपल्याला पूर्ण करता येते.

फक्त विद्यार्थ्यांनीच नव्हे तर पालकांनीही स्वतःचे स्वोट (SWOT) ॲनालिसिस करून ध्येयप्राप्तीचा मार्ग सुकर करून घ्यायला हवा.

**संकलन - श्री. महेश गोरडे**

**आरोग्यम् या विभागात आपल्या आरोग्यासाठी दैनंदिन जीवनात सहजतेने अमलात आणता येतील अशा सोप्या उपयुक्त सुचना दिल्या आहेत.**




## बदाम खा !

बदाम खाल्ल्याने कॉलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत होते. तसेच आपल्या आधुनिक जीवनपद्धतीमुळे होणाऱ्या विकारांचा धोकाही बदामाच्या सेवनामुळे कमी करता येतो.



## एका पायावर ८ ते १० सेकंद उभे राहणे

दररोज एका पायावर ८ ते १० सेकंद उभे राहिल्याने आपली एकाग्रता वाढण्यास मदत होते. एका पायावर उभे राहणे ही क्रिया म्हणजेच स्वत:चा तोल सांभाळणे, ही क्रिया आपली मनस्वास्थ संतुलित करण्यात खूप फायदेशीर ठरते.



## डोळ्यांची काळजी

कॉम्प्युटरवर काम करतेवेळी बराच वेळ स्क्रीनकडे पाहिल्यावर डोळ्यांना त्रास होण्याची शक्यता असते, अशा वेळेस दोन्ही डोळे बंद करून तळहातांनी अलगद झाकावे. ५ ते १० सेकंदांनी डोळे उघडून एखादी दूरवरची वस्तू अथवा दृश्य पाहावे. याने डोळ्यांना नक्कीच आराम मिळेल.

## मानसिक ताण कमी करा



दिवसातून ३० मिनिटे आपल्या आवडीच्या कामासाठी किंवा छंदासाठी द्या. उदा. एखादे प्रेरणादायी पुस्तक वाचणे, बागेत फिरायला जाणे, मित्रांसोबत चर्चा करणे किंवा आवडीचे गाणे ऐकणे, योगसाधना इ. काम जे आपल्याला मानसिक समाधान देतात.

---

## *विद्यार्थ्यांसाठी एक कविता...*

To You,
Dear Student, We celebrate!
You are the festival of Diwali that brightens the Darkness..
You are the festival of Holi
Your many sided personality enlivens our life.
You are the festival of Dashera
Your power of innocence is strong to overcome the power of evil...
You are the festival of Christmas
Your love and tolerance has been our strength !
You are the festival of Ramzan
Your perseverance and zeal gave us the inspiration
To forge ahead !
God bless you, Dear students !

## *अभिनंदन...*

**एसडी-सीडचे अनेक लाभार्थी शिक्षण पूर्ण करून विविध क्षेत्रात काम करत असून स्वत:च्या पायावर आज ते उभे आहेत... एसडी-सीड तर्फे त्यांचे अभिनंदन**

- **समाधान लक्ष्मण माळी,** पाचोरा- लातूर येथे शिक्षण विभागातर्फे सर्व शिक्षण अभियानात अंध विद्यार्थ्यांसाठी शिक्षक म्हणून कार्यरत.
- **दर्शन प्रकाशचंद जैन,** जळगाव- नाशिकच्या अंबड एम.आय.डी.सी. येथील स्वामी समर्थ इलेक्ट्रॉनिक्स मध्ये डिझाईन इंजिनिअर म्हणून कार्यरत.
- **अमोल मधुकर अहिरराव,** चाळीसगाव- भारतीय जैन संघटना यांच्या 'मूल्यवर्धन' या प्रोजेक्टमध्ये शिरसोली, जळगाव येथे शिक्षक म्हणून कार्यरत.

## आमची उद्दिष्टे

- सर्व पात्र विद्यार्थ्यांना २१ व्या शतकातील भारताच्या विकासात सहभागी होण्याची संधी प्राप्त करून देणे.
- विद्यार्थी, पालक व शिक्षकांमध्ये शिक्षणाचे महत्त्व आणि परिणामाबद्दल प्रबोधन करणे.
- सर्व पात्र विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक व उद्योजकीय ध्येय गाठण्यासाठी आर्थिक मदत करणे.
- विद्यार्थी, पालक व शिक्षकांना सक्षम बनविण्यासाठी नवनवीन उपक्रम विकसित करून ते अंमलात आणणे.
- सर्व उपक्रमांना स्वयंपूर्ण बनवणे, ज्यायोगे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना त्यांचा लाभ मिळेल.

## विद्यार्थ्यांच्या मनातील एसडी-सीड...



**प्रवीण विचवे,** जळगाव - मागील २ वर्षांपासून एसडी-सीडतर्फे मला शिष्यवृत्ती मिळत आहे. माझे आई आणि वडील दोघांचा स्वर्गवास झाला आहे. मी माझी आजी आणि लहान भाऊ यांच्यासोबत राहतो. दादा आपल्या जळगाव जिल्ह्यातील विद्यार्थ्यांकरिता खूप मोठे काम करीत आहेत.



**किरण शामराव बागुल,** पाचोरा - एसडी-सीड मधून फक्त आर्थिक मदतच मिळत नसून विविध कार्यक्रमांतून सर्व विद्यार्थ्यांमध्ये मदतीची, माणुसकीची, स्वावलंबपणाची मूल्यं रुजविली जात आहे. म्हणून केवळ शिक्षित समाज न घडविता खऱ्या अर्थाने सुशिक्षित समाज घडविण्याचे कार्य एसडी-सीड मार्फत होतेय.



**प्रियंका बोरोले,** रावेर - मा. दादांनी समाजकार्याचे जे बीज रोवले आहे ते आज एक वटवृक्ष झाले आहे. अजून एक अभिमानाची गोष्ट म्हणजे येणारी पिढीसुद्धा आता विद्यार्थ्यांना मदत करण्यास उत्सुक आहे.



**करिश्मा दिलीप चव्हाण,** जळगाव - एसडी-सीडने आयोजित केलेल्या युवती सशक्तीकरण शिबिरात आम्हाला भावी आयुष्य सुरळीतरित्या जगण्यासाठी सक्षम केलेले आहे. परिवारात छोट्या-मोठ्या गोष्टींवरून होणारे वाद कसे सोडवावेत, टि.व्ही., मोबाईल, इंटरनेट या प्रसारमाध्यमांचे किती व कसे दुषरिणाम आहेत, हे सुद्धा आम्हाला कळले.

आवाहन: या बातमीपत्रात प्रकाशित करण्यासाठी आपणाकडून योग्य ते साहित्य उदा. विद्यार्थ्यांना प्रेरणादायी लेख, शैक्षणिक क्षेत्रातील माहिती, आरोग्यविषयक उपयुक्त सुचना इ. अपेक्षित आहे. संबंधित साहित्य आपण एसडी-सीडच्या खालील पत्त्यावर पाठवू शकता.

SD SEED

Suresh Dada Scheme for
Educational & Entrepreneurial Development
सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजक विकास योजना

**Head Office:** 7, Shivaji Nagar, Jalgaon - 425001. Maharashtra. India.
Tel.: (0257) 2235254 Fax: (0257) 2234258. Website: www.sdseed.in